961/–

# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. ११८/प्रनिप्रा/११९४

दिनांक : 12 MAY 2022

**बैठकीचे इतिवृत्त**

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, **दिनांक ३० मार्च, २०२२ रोजी दुपारी १२:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक ४९ व्या बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ४) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा., ५) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, ६) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा, व ७) श्री. रविंद्र जगताप (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

१) डॉ. सुभाष महाजन, परीक्षा समन्वयक, तंत्र शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, तथा अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई, २) श्री. हरीविजय शिंदे, सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे, ३) डॉ. जी.टी. केदार, सहा. परिक्षा समन्वयक-उच्च शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष व ४) श्री. जयंत पाटील, सहा. परिक्षा समन्वयक-उच्च शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकींचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

<u>विषय क्रमांक १</u>: **<u>खालील नमूद तपशीलाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.</u>**

| अ. क्र. | बैठकीचे वेळापत्रक | | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | | |
| १) | ३०/०३/२०२२ | दुपारी ०३:०० वा. | उच्च शिक्षण | पदवी बी.एड. - एम.एड. (इंटिग्रेटेड) |

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

विषयांकित अभ्यासक्रमामध्ये ०१ महाविद्यालयाचा सहभाग होता. सदर महाविद्यालयाचा दिनांक २८/०३/२०२२ रोजीचा प्रवेश पडताळणी अहवाल संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या दिनांक २८/०३/२०२२ रोजीच्या ई-मेलद्वारे प्राप्त झाला. अधिनियम २०१५ , कलम ९(५ ) मधील तरतुदीनुसार संबंधित महाविद्यालयांनी प्रवेश मान्यता प्रस्ताव प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे सादर करणे अनिवार्य आहे. परंतु, या महाविद्यालयांकडून तसा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. त्यामुळे सध्या प्रवेश अमान्य करण्यात येत आहे.

संबंधित महाविद्यालयाच्या प्रवेश मान्यतेबाबत प्रवेश मान्यता प्रस्ताव प्राधिकरणास प्राप्त झाल्यानंतर व प्राधिकरण स्तरावर १% प्रवेशांची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर प्रवेश मान्यतेबाबत निर्णय घेण्यात येईल.

विषय क्रमांक २ : मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.

निरंक

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 10/5/22